महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १३ वे दिनांक : १/१/२०२६ वार : गुरूवार

## माणिकराव कोकाटे जामीन प्रक्रियेसाठी रुग्णालयातून थेट न्यायालयात



**मुंबई** : १९९५ च्या बहुचर्चित सदनिका घोटाळा प्रकरणी झालेल्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यानंतर, माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार माणिकराव कोकाटे यांनी आज जामीन प्रक्रियेसाठी न्यायालयात हजेरी लावली. प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णालयात उपचार घेत असलेले कोकाटे थेट रुग्णालयातूनच न्यायालयात पोहोचले. यावेळी प्रसारमाध्यमांनी त्यांना झालेली शिक्षा आणि भविष्यातील मंत्रिपदाबाबत विचारणा केली असता, त्यांनी अधिक भाष्य करणे टाळले. जे काही बोलायचे आहे, ते माझ्या वकिलांशी बोला, असे उत्तर देत त्यांनी या विषयावर बोलणे टाळले.

नाशिकमधील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी फेब्रुवारी महिन्यात याप्रकरणी माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या बंधूंना दोषी ठरवून दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर डिसेंबर महिन्यात नाशिक जिल्हा सत्र न्यायालयानेही ही शिक्षा कायम ठेवली होती. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाने या शिक्षेला स्थगिती दिल्याने कोकाटे यांना मोठा दिलासा मिळाला असून, त्या पार्श्वभूमीवर त्यांनी आज जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली.

नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने शिक्षा कायम ठेवल्यानंतर पोलिसांनी माणिकराव कोकाटे यांना ताब्यात घेण्याच्या हालचाली सुरू केल्या होत्या. मात्र, याच काळात प्रकृती बिघडल्याने कोकाटे रुग्णालयात दाखल झाले. त्यांनी कायदेशीर दिलासा मिळवण्यासाठी मुंबई उच्च न्यायालय आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. अखेर सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिल्याने कोकाटे यांना मोठा दिलासा मिळाला आणि त्यांची अटकेच्या कारवाईतून तात्पुरती सुटका झाली.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर जामीन प्रक्रियेची पूर्तता करण्यासाठी माणिकराव कोकाटे आज रुग्णालयातून थेट न्यायालयात हजर झाले. जामीन अर्जावर स्वाक्षरी केल्यानंतर प्रसारमाध्यमांनी त्यांना या संपूर्ण कायदेशीर संघर्षाबद्दल आणि पुढील भूमिकेबद्दल विचारले असता, त्यांनी अधिक बोलणे टाळले. काय बोलायचे ते माझ्या वकिलांशी बोला, मला आता थोडा आराम करू द्या, मला काही नको आहे, अशी त्रोटक प्रतिक्रिया देत त्यांनी आपली बाजू मांडण्याचे टाळले.

## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

## पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप-शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का



**मुंबई** : महापालिका निवडणुकीसाठी अर्जांची छाननी आजपासून सुरू झाली असून अनेक ठिकाणी आक्षेप घेतल्याने उमेदवारांचे अर्ज बाद ठरत असल्याचे समोर येत आहे. मुंबईतील दोन प्रभागात उमेदवारांचे अर्ज बाद झाल्यानंतर आता पुण्यातील पिंपरी चिंचवडमध्ये भाजपच्या तीन उमेदवारांचेही अर्ज बाद झाल्याची माहिती समोर आली आहे.

पिंपरी चिंचवडमध्ये भाजप आणि शिवसेना शिंदे गटाला मोठा फटका बसला आहे. येथील प्रभाग २४ मधील भाजपच्या तीन जागेवरील आणि शिवसेना शिंदे गटातील दोन उमेदवारांचे एबी फॉर्म बाद ठरवण्यात आले आहेत. त्यामुळे आता येथील उमेदवारांना अपक्ष निवडणूक लढवावी लागणार आहे.

शिवसेना खासदार श्रीरंग बारणेंच्या प्रभागात युतीत स्वबळावर लढणाऱ्या दोन्ही पक्षांना हा मपठा फटका बसला आहे. अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर हे पाचही एबी फॉर्म जमा झाले होते. त्यावर विरोधी उमेदवारांनी आक्षेप घेतला होता. त्यामुळे आजच्या छाननीमध्ये एबी फॉर्म बाद ठरवण्यात आले आहेत. आता या जागांवर पाचही उमेदवारांना अपक्ष लढावे लागणार आहे. दरम्यान, आता प्रभाग २४ मध्ये कमळ चिन्हावर एकच उमेदवार असेल तर शिवसेना शिंदे गटाचे दोन उमेदवार धनुष्यबाण या चिन्हावर लढतील.

मुंबई महापालिका निवडणुकीत वॉर्ड क्रमांक २११ आणि २१२ मध्ये भाजपच्या उमेदवारांचे अर्ज फेटाळले गेल्याने पक्षाला मोठा तांत्रिक फटका बसला आहे. वॉर्ड २११ मधील उमेदवार शकील अन्सारी यांचा अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या अपूर्ततेमुळे बाद झाला, तर वॉर्ड २१२ मध्ये मंदाकिनी खामकर या अर्ज भरण्यासाठी अवघी १५ मिनिटे उशिरा पोहोचल्याने निवडणूक आयोगाने त्यांचा अर्ज स्वीकारण्यास नकार दिला. या दोन्ही प्रभागांत भाजपचे अधिकृत उमेदवार रिंगणाबाहेर गेल्याने, भाजपने येथे प्रतिस्पर्धी पक्षांना एक प्रकारे 'बाय' दिला असल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

अर्ज छाननी प्रक्रियेदरम्यान शिवसेना ठाकरे गटाच्या पाच उमेदवारांचे अर्ज तांत्रिक कारणास्तव अडचणीत आले असून, त्यामुळे पक्षात चिंतेचे वातावरण आहे. मालाड पूर्वेतील प्रभाग क्रमांक ३८, ३९, ४०, ४१ आणि ४२ मधील ठाकरे गटाच्या उमेदवारांनी सादर केलेल्या एबी फॉर्मवर डिजिटल स्वाक्षरी असल्याचे समोर आले आहे. या डिजिटल स्वाक्षरीवर शिवसेना शिंदे गटाचे विभाग प्रमुख वैभव भरडकर यांनी अधिकृत आक्षेप नोंदवल्यामुळे या पाचही उमेदवारांची उमेदवारी धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली असून, निवडणूक निर्णय अधिकारी यावर काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १ जानेवारी २०२६


# जिंतूर येथे तालुकास्तरीय सांस्कृतिक महोत्सव उत्साहात संपन्न



**जिंतूर (बी.डी. रामपूरकर )** शिक्षण विभाग जिंतूर अंतर्गत आज तालुकास्तरीय सांस्कृतिक कार्यक्रमाचे अत्यंत दिमाखदार आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचा पंचकोश विकास.... हाच आमचा ध्यास हे ध्येय ठेवून काम करणाऱ्या शिक्षण विभागाने स्थानिक पातळीवरील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याला तालुक्यातील शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.हा कार्यक्रम गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले साहेब यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी बोलताना पोले साहेब यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासासोबतच कला आणि क्रीडा क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित केले. तालुकास्तरीय सांस्कृतिक महोत्सवाच्या आयोजनासाठी श्री राधाकृष्ण मंगल कार्यालय मोफत उपलब्ध करून देणाऱ्या श्री कैलासराव आदमाने यांचे आभार मानले. त्यांच्या महत्त्वपूर्ण सहकार्यामुळेच शिक्षण विभागाचे आजपर्यंतचे सर्व भव्य कार्यक्रम आयोजित करणे शक्य झालेले आहे. त्याबद्दल शिक्षण विभागाच्या वतीने त्यांचे आम्ही आजन्म ऋणी आहोत. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे सादर झालेली विविध गीते आणि नृत्याविष्कार. तालुकास्तरीय सांस्कृतिक महोत्सवांमध्ये वैयक्तिक नृत्य, सामूहिक नृत्य, नाट्यीकरण या तीन स्पर्धा पहिली ते पाचवी व सहावी ते दहावी या दोन गटात घेण्यात आल्या एकूण 89 स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. या सर्व सादरीकरणाचा (Performances) नेटका क्रम, नावनोंदणी प्रक्रिया यासाठी माधव दोसलवार यांनी मेहनत घेतली. परीक्षण विभाग योगिता संगवई यांनी सांभाळला. सुधन सानप, गणेश पारनेरकर, बालाजी काळे, माने, गवई, अभिषेक नांदुरे, बिभीषण वाव्हळ, श्रीमती मनीषा क्षिरसागर, श्रीमती दलाल यांनी परीक्षणाचे कार्य केले. संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन साहित्यिक मयूर जोशी यांनी आपल्या खास शैलीत केले, ज्यामुळे प्रेक्षकांची उत्कंठा शेवटपर्यंत टिकून राहिली.या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी रावसाहेब कातकडे, केशव घुगे, मारुती घुगे, पांडुरंग भांबळे, दिनकर घुगे, देवानंद सावंत, निलेश लटपटे, अनिल स्वामी, सचिन हजारे, शंकर दांडगे, शंकर खिस्ते, तुकाराम चव्हाण, दिनकर चौधरी, माधव गडदे, अमोल सोनटक्के, बिभीषण राठोड, शंकर चव्हाण, राजेश चव्हाण यांच्यासह शिक्षण विभाग जिंतूर अंतर्गत येणारे सर्व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. जिंतूर तालुक्यातील शिक्षण क्षेत्रातील या मोठ्या सांस्कृतिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# महानगरपालिका निवडणूक जनजागृती कार्यक्रम







**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथील विद्यार्थ्यांनी पोस्टरद्वारे जनजागृती केली आहे. हे पोस्टर्स मतदानाचे महत्त्व, "मतदान हा आपला हक्क आणि कर्तव्य" हे संदेश, निवडणुकीच्या तारखा आणि लोकशाही मूल्ये यावर केंद्रित होते. सदर उपक्रम श्री. के. बी. चौधरी (मुख्याध्यापक) यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने आकर्षक पोस्टर्स तयार केले, ज्यात रंगीबेरंगी चित्रे, घोषवाक्ये तयार केली. शाळा परिसरात, गावात आणि जवळच्या भागात स्थानिक नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. याप्रसंगी सर्व शिक्षक उपस्थित होते.

# उपक्रम छोटा संदेश मोठा



**रघुनाथपूरवाडी :** जि. प. प्रा. शा. रघुनाथपूरवाडी शाळेतील ऋतुराज जाधव (वर्ग ६ वा) या विद्यार्थ्यांच्या हातास झालेल्या दुखापतीमुळे तो काही दिवस शाळेत येऊ शकला नाही. त्याला हाताने लिहिता येणे ही अवघड होते. त्यामुळे शाळेतील वर्गमित्र आणि ऋतुराजचा संपर्क तुटला होता .याचे सर्व विद्यार्थ्यांना वाईट वाटले. त्याला पुन्हा शाळेत आणण्यास प्रोत्साहन देण्यासाठी वर्गातील विद्यार्थ्यांनी प्रत्येकी १० रुपये जमा करून ऋतुराजला शालेय साहित्य व खेळणीचा संच भेट दिला. त्यामध्ये दुरेघी, चाररेघी वही, पुस्तक, पेन, खोडरबर, रंगपेटी, चेंडू इत्यादी बऱ्याच प्रकारचे साहित्य आकर्षक पॅकिंग करून देण्यात आले. यामुळे ऋतुराजची शाळेची तुटलेली नाळ पुन्हा जोडल्या गेली. याप्रसंगी मुख्याध्यापक साईनाथ कवार ,संजय जाधव सर ,सूर्यकांत फडसर महेश खोसे सर जी बी पवार मॅडम व श्रीमती राशिनकर मॅडम सह विद्यार्थी उपस्थित होते. खारीचा वाटा उचलल्याचे समाधान प्रत्येक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट झळकत होते . आणि आपण एकटे नसून वर्गातील विद्यार्थी, शिक्षक व शाळा आपल्या सोबत आहे याचा आनंद ऋतुराज ला किती झाला हे शब्दात सांगणे अवघड होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १ जानेवारी २०२५


## जप्त केलेला १४.७९ लाखांचा मुद्देमाल तक्रारदारांना परत

**हिंगोली :** जिल्ह्यात डिसेंबर महिन्यात विविध गुन्ह्यांमध्ये जप्त केलेला 14.79 लाख रुपयांचा मुद्देमाल बुधवारी ता. 31 तक्रारदारांना परत करण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक निलभ रोहन यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

हिंगोली जिल्ह्यातील पोलिस ठाण्यांतर्गत दाखल झालेले घरफोडी, चोरी, वाहन चोरीचे गुन्हे उघडकिला आणण्यासाठी पोलिस विभागाकडून स्थानिक पोलिसांसह विशेष पथके स्थापन करण्यात आली आहे. या शिवाय स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले, सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे यांचे पथकही कार्यरत ठेवण्यात आले आहेत.

या पथकाकडून डिसेंबर महिन्यात घरफोडीचे चार गुन्हे उघडकिला आणण्यात आले आहे. या शिवाय चोरीला गेलेली तीन वाहने देखील जप्त करण्यात आली आहेत. या शिवाय इतर मुद्देमालाचा समावेश आहे. पोलिस ठाण्यांतर्गत गुन्हयांमधून जप्त केलेला मुद्देमाल तक्रारदारांना परत करण्याचा उपक्रम पोलिस अधीक्षक निलभ रोहन यांच्या पुढाकारातून राबविला जात आहे.

आज पोलिस अधिक्षक निलभ रोहन, अप्पर पोलिस अधिक्षक कमलेश मीना, उपाधिक्षक कुंदनकुमार वाघमारे, राजकुमार केंद्रे, गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले, जमादार प्रेमदास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मुद्देमाल करण्यात आला आहे. यामध्ये हिंगोली शहर, सेनगाव, नर्सी नामदेव, सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत दाखल झालेल्या चार गुन्हयातील 1.54 लाख रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने तक्रारदारांना परत करण्यात आले आहेत. या शिवाय चोरीला गेलेली 7 लाख रुपयांची तीन वाहने जप्त करून सदर वाहने आज तक्रारदारांना परत करण्यात आली आहेत. या शिवाय इतर 6.20 लाख रुपयांचा जप्त केलेला मुद्देमालही पोलिस ठाण्यांत आयोजित कार्यक्रमात तक्रारदारांना बोलावून परत करण्यात आला आहे. चोरीला गेलेला मुद्देमाल परत मिळाल्यामुळे तक्रारदारांनी समाधान व्यक्त केले आहे.

## नवा सूर्य

रोज नवा सूर्य उगवून
उजेडाचे दान देतो
रान वाऱ्याच्या मनात
गीत हिरवे ठेवून जातो
भर उन्हात जीवाची
लाही लाही करून जातो
थकलेल्या पारंब्यासाठी
झाड सावलीचे होतो
सूर्य मावळता काळोख
जन्मभराचा उरी दाटतो
कितीही जळली वात जरी
उजेड सदाचा रुसतो
दिसामागे रात येते
काळजाला आरपार चिरते
हरवलेल्या ताऱ्यांची
भेट पुन्हा राहून जाते
आठवणींच्या पावसात
बालपण हरवून जाते
होरपळलेले रान वेडे
मिरगाची वाट पाहते



ज्ञानेश्वर गायके,कन्नड

## एक जानेवारी

एक जानेवारी
आनंदाचा नि हर्षाचा
सोहळा साजरा करूया
उगवतीच्या नववर्षाचा
करूया नवे संकल्प
टीकवूया नाती
जनसेवेचे व्रत
घेवूया हाती
निसर्गाच्या कुशीत
फुलली धरा
मनाला भुरळ घाली
तो गंधीत वारा
मनातील कटूता
विसरूया सारी
सलोख्याचे तोरण
बांधूया दारी
किलबिल पक्ष्यांचा
नभी उडाला थवा
खुलवूया रंग
चैतन्याचा नवा



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६







महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १ जानेवारी २०२६

# भीमा कोरेगाव शौर्य दिन : सामाजिक समतेच्या संघर्षाची प्रेरणागाथा

भारतीय समाजाच्या इतिहासात काही घटना केवळ लष्करी विजय किंवा पराभव म्हणून मर्यादित राहत नाहीत, तर त्या सामाजिक परिवर्तनाच्या, आत्मसन्मानाच्या आणि समानतेच्या संघर्षाचे प्रतीक बनतात. १ जानेवारी रोजी साजरा होणारा ‘भीमा कोरेगाव शौर्यदिन’ ही अशीच एक ऐतिहासिक घटना आहे. १८१८ साली भीमा नदीच्या काठावर घडलेली भीमा कोरेगावची लढाई ही केवळ इंग्रज आणि पेशवाई यांच्यातील संघर्ष नव्हता, तर तो तत्कालीन सामाजिक विषमतेविरुद्ध उभा राहिलेल्या शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या आत्मसन्मानाचा लढा होता. म्हणूनच हा दिवस केवळ इतिहासातील एक पान नसून, आजही सामाजिक समतेच्या संघर्षाला दिशा देणारा प्रेरणास्तंभ आहे.पेशवाईच्या काळात भारतीय समाजावर कडव्या जातिव्यवस्थेचे जाचक ओझे होते. विशेषतः महार, मांग, चांभार यांसारख्या दलित समाजघटकांवर अमानवी निर्बंध लादले गेले होते. सार्वजनिक विहिरी, मंदिरे, शिक्षण, प्रतिष्ठा आणि मानवी हक्क यांपासून त्यांना दूर ठेवण्यात आले होते. अशा स्थितीत पेशवाईविरोधात उभे ठाकलेले महार समाजातील सैनिक इंग्रज सैन्यात सहभागी झाले आणि त्यांनी भीमा कोरेगावच्या रणांगणावर पराक्रम गाजवला. संख्येने कमी असूनही त्यांनी पेशव्यांच्या बलाढ्य सैन्याला रोखले. या विजयाने दलित समाजाला केवळ लष्करी यश मिळाले नाही, तर त्यांनी सामाजिक अपमानाच्या इतिहासाला छेद दिला.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, भीमा कोरेगावची लढाई ही सत्ता, जात आणि प्रतिष्ठा यांच्यातील संघर्षाचे प्रतीक आहे. तत्कालीन सामाजिक रचना ही सत्ताधारी उच्चवर्णीयांच्या बाजूने झुकलेली होती. पेशवाई ही केवळ राजकीय सत्ता नव्हती, तर ती धार्मिक-सामाजिक वर्चस्वाचीही प्रतिनिधी होती. अशा व्यवस्थेविरुद्ध उभा राहणे म्हणजे केवळ युद्ध जिंकणे नव्हे, तर सामाजिक मानसिकतेला आव्हान देणे होते. महार सैनिकांनी हे आव्हान स्वीकारले आणि इतिहासात आपले नाव कोरले.या घटनेचे महत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले. त्यांनी १ जानेवारी १९२७ रोजी भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला मानवंदना दिली. त्या दिवसापासून भीमा कोरेगाव शौर्यदिनाला सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. डॉ. आंबेडकरांसाठी हा विजय ब्रिटिशांच्या बाजूने मिळालेला लष्करी यश नव्हता, तर तो अस्पृश्यतेविरुद्ध उभ्या राहिलेल्या आत्मसन्मानाचा विजय होता. त्यांनी या घटनेचा उपयोग दलित समाजात स्वाभिमान, संघटन आणि संघर्षाची चेतना निर्माण करण्यासाठी केला.भीमा कोरेगाव शौर्यदिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व समजून घेताना स्मृती-राजकारण (Politics of Memory) या संकल्पनेचा विचार करणे आवश्यक आहे. कोणता इतिहास सांगितला जातो, कोणता दडपला जातो आणि कोणाच्या स्मृती जपल्या जातात, यावर समाजाची दिशा ठरते. पारंपरिक इतिहास लेखनात दलित, स्त्रिया आणि वंचित समाजघटकांचे योगदान दुर्लक्षित राहिले. भीमा कोरेगावची आठवण ही या दुर्लक्षित इतिहासाला केंद्रस्थानी आणणारी आहे. म्हणूनच हा दिवस केवळ भूतकाळाची आठवण नाही, तर इतिहास पुन्हा मांडण्याचा सामाजिक प्रयत्न आहे.आज भीमा कोरेगाव शौर्यदिन मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. देशभरातून लाखो लोक या ठिकाणी एकत्र येतात. ही केवळ श्रद्धांजली नसून, ती एक सामाजिक जाणीव आहे. या एकत्र येण्यामागे समानतेची आकांक्षा, संविधानिक मूल्यांची निष्ठा आणि अन्यायाविरुद्धचा आवाज दडलेला आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हा मेळावा ‘सामूहिक ओळख’ (Collective Identity) निर्माण करतो. जात, वर्ग, प्रदेश यापलीकडे जाऊन लोक एकमेकांशी जोडले जातात.मात्र, भीमा कोरेगाव शौर्यदिनाच्या संदर्भात उद्भवणारे वाद आणि संघर्षही समाजशास्त्रीय विश्लेषणाची मागणी करतात. काही घटकांना हा दिवस अस्वस्थ करतो, कारण तो पारंपरिक सत्तासंरचनांना प्रश्न विचारतो. इतिहासाचे वेगवेगळे अर्थ लावले जातात आणि स्मृतींवर अधिकार मिळवण्यासाठी संघर्ष होतो. या पार्श्वभूमीवर, समाजात संवाद, समज आणि सहअस्तित्वाची गरज अधोरेखित होते. भीमा कोरेगावची प्रेरणा संघर्षाची असली, तरी तो संघर्ष मानवी मूल्यांसाठी आहे, द्वेषासाठी नव्हे.आजच्या काळात, जेव्हा संविधानिक मूल्ये, सामाजिक समता आणि लोकशाहीवर विविध प्रकारचे आव्हाने येत आहेत, तेव्हा भीमा कोरेगाव शौर्यदिन अधिकच महत्त्वाचा ठरतो. हा दिवस आपल्याला सांगतो की अधिकार सहज मिळत नाहीत; त्यासाठी संघटित संघर्ष करावा लागतो. दलित समाजाचा हा इतिहास केवळ एका समाजापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण भारतीय लोकशाहीच्या प्रवासाचा भाग आहे.शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक प्रतिष्ठा या क्षेत्रांत आजही असमानता दिसून येते. भीमा कोरेगावची आठवण ही या असमानतेविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देते. समाजशास्त्रीय दृष्टीने, हा दिवस सामाजिक गतिशीलतेचा (Social Mobility) संदेश देतो. इतिहासात दडपल्या गेलेल्या समाजघटकांनी शिक्षण, चळवळ आणि संविधानाच्या माध्यमातून आपले स्थान बदलू शकते, हे भीमा कोरेगावचे प्रतीक आहे.म्हणूनच, भीमा कोरेगाव शौर्यदिन साजरा करताना केवळ भूतकाळाचा गौरव न करता वर्तमान आणि भविष्याचा विचार करणे आवश्यक आहे. जातीय द्वेष, सामाजिक बहिष्कार आणि असमानता यांना नकार देत, समतेवर आधारित समाज उभारण्याचा संकल्प करण्याची ही वेळ आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या संविधानिक मूल्यांच्या चौकटीत राहून, लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याची प्रेरणा भीमा कोरेगाव आपल्याला देते.अखेरीस असे म्हणता येईल की, भीमा कोरेगाव शौर्य दिन हा केवळ एका लढाईचा स्मृतिदिन नाही, तर तो सामाजिक न्यायाच्या दीर्घ संघर्षाचा प्रतीकात्मक उत्सव आहे. हा दिवस आपल्याला इतिहासातून शिकवतो की, अन्याय कितीही खोल रुजलेला असला, तरी संघटित इच्छाशक्ती, आत्मसन्मान आणि समानतेची जाणीव त्याला आव्हान देऊ शकते. म्हणूनच १ जानेवारी हा दिवस शौर्याचा, स्वाभिमानाचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या अखंड प्रवासाचा साक्षीदार ठरतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),

bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १ जानेवारी २०२६

# छत्रपती संभाजीनगरच्या आधुनिक सावित्रीबाई : समाजपरिवर्तनाचा ध्यास घेतलेली शिक्षिका - सरला शामराव कामे



**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षण ही केवळ नोकरी नाही, तर समाजपरिवर्तनाची प्रभावी चळवळ आहे, याचे जिवंत उदाहरण म्हणजे श्रीमती सरला शामराव कामे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , धोत्रा (ता. सिल्लोड) येथे कार्यरत असून गेली २९ वर्षे अध्यापन करत असताना त्यांनी स्वतःला केवळ वर्गखोलीपुरते मर्यादित न ठेवता, शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना हात घालण्याचे धैर्य दाखवले. त्यामुळेच आज त्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील 'आधुनिक सावित्रीबाई' म्हणून ओळखल्या जातात.शिक्षक ते समाजसेवक — प्रवासाची सुरुवातसेवेच्या सुरुवातीच्या काळात त्यांना आपले गुण, कौशल्ये विकसित करण्यासाठी पुरेशी संधी वा व्यासपीठ उपलब्ध नव्हते. मात्र "शिक्षक हा समाजाचे देणे लागतो" ही भावना त्यांच्या मनात खोलवर रुजलेली होती. विद्यार्थ्यांना गुणवंत घडवतानाच समाजातील दाहक प्रश्नांकडे दुर्लक्ष करता कामा नये, असा ठाम विचार त्यांनी मनाशी धरला आणि तेथूनच त्यांच्या समाजकार्याची सुरुवात झाली.बोलक्या बाहुल्यांतून जनजागृतीसरला कामे यांनी शालेय अध्यापनात बोलक्या बाहुल्यांचा (पपेट शो) वापर करून मनोरंजनात्मक अध्यापनाची प्रभावी पद्धत विकसित केली. या माध्यमातून त्यांनी स्वच्छ भारत अभियान, बेटी बचाओ बेटी पढाओ, मतदान जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, एड्स जनजागृती, कोरोना जनजागृती, हर घर तिरंगा अशा विविध देशव्यापी उपक्रमांचे जनजागरण महाराष्ट्रभर केले.गावोगावी चौक, शाळा, सार्वजनिक ठिकाणी नाट्यमय सादरीकरण करून ग्रामीण जनतेला सक्रियपणे जागरूक करण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले. त्यांच्या या कार्यामुळे अनेक सामाजिक प्रश्नांवर ग्रामीण समाजात चर्चा सुरू झाली."वर्गापुरतं शिक्षण न ठेवता,गावोगावी विचार नेला,बाहुल्यांच्या हातात मशाल देऊन,समाजजागृतीचा मार्ग दाखविला."मुलींच्या हक्कांसाठी अखंड लढामुलींवर होणारे अत्याचार, भ्रूणहत्या, लैंगिक शोषण, एकतर्फी प्रेमातून होणारे गुन्हे, ॲसिड हल्ले अशा गंभीर विषयांवर त्यांनी निर्भीडपणे जनजागृती केली. या कार्यातून सुमारे १००० भ्रूणहत्या रोखण्यात त्यांना यश मिळाले आहे. तसेच १० गरीब व निराधार मुलींना शिक्षणासाठी दत्तक घेऊन त्यांचा शैक्षणिक प्रवास सक्षम केला.मुलींना आत्मविश्वास व सुरक्षितता मिळावी म्हणून त्यांनी कराटे प्रशिक्षण दिले. दुर्गम व आदिवासी भागातील मुली आता स्वतःचे संरक्षण स्वतः करू शकतात, शाळेत येताना घाबरत नाहीत, हे त्यांच्या कार्याचे मोठे यश आहे.शाळाबाह्य व विशेष मुलींना शिक्षणाच्या प्रवाहातदुर्गम वाडी-वस्तीतून येणाऱ्या मुली शिक्षणापासून दूर राहत होत्या. सरला कामे यांनी वैयक्तिक पाठपुरावा करून त्यांना मुख्य प्रवाहात आणले आणि १००% शैक्षणिक यश साधले. अपंग व विशेष गरजा असलेल्या मुली शाळेत येण्यास घाबरत असत; बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून त्यांना शिक्षणाची गोडी लावून अध्यापन प्रवाहात सामावून घेतले.शाळेपासून पाच किलोमीटर अंतरावर राहणाऱ्या मुलींना विविध संस्थांच्या सहकार्याने सायकली उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे त्यांचा पायी प्रवास कमी होऊन नियमित उपस्थिती वाढली.रोबोटिक बाहुली व नवे शिक्षण तंत्रग्रामीण भागात विद्यार्थी टीव्हीवरील कार्टूनकडे जास्त आकर्षित होतात, याचे दुष्परिणाम लक्षात घेऊन त्यांनी अभ्यासक्रमाशी निगडित कार्टून पपेट्स व रोबोटिक बाहुली विकसित केली. या बाहुलीच्या माध्यमातून इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान, भाषा विषय नाट्यरूपात शिकवले जातात. परिणामी विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण झाली असून शेतकऱ्यांची मुलेही आता शाळेत नियमित उपस्थित राहतात. १००% विद्यार्थी शाळेत टिकून राहणे हे या उपक्रमाचे ठळक यश आहे. या रोबोटिक बाहुलीचे कौतुक संपूर्ण भारतभर झाले आहे.शाळा विकास आणि स्वच्छता उपक्रमलोकवर्गणीतून शाळेसाठी संगणक, CCTV कॅमेरे, माईक-स्पीकर, शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी एक्वागार्ड फिल्टर, स्वच्छतागृहात पाण्याची सोय, तसेच शालेय परिसरात वृक्षारोपण करून वातावरण सुशोभित करण्यात आले. स्वच्छ भारत अभियानांतर्गत गावोगावी जाऊन कचरा साफसफाई, तलाव स्वच्छता करून पाणी पुनर्वापरात आणले.विरोध, उपेक्षा आणि तरीही न थांबलेली वाटचालसमाजातील काही घटकांनी त्यांच्या कार्याला विरोध केला. "तुम्ही फक्त शिकवण्याचे काम करा" अशी टीका झाली, अपमान सहन करावा लागला. मात्र त्या कधीही डगमगल्या नाहीत. त्यांच्या चिकाटीमुळे आज समाजात मोठ्या प्रमाणावर सकारात्मक बदल दिसून येतो.'विरोधाच्या वावटळीतही,दीप मावळू दिला नाही,समाजबदलाचा ध्यास घेतला,पाऊल मागे कधी टाकलं नाही.सन्मान आणि कार्याची ओळखसरला कामे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र शासनाचा 'थोर सावित्रीबाई फुले राज्य आदर्श शिक्षिका पुरस्कार', तसेच राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर एकूण 65 पुरस्कार प्राप्त झाले आहेत.आजही भारतात मुलींचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि समानतेसाठी मोठा संघर्ष सुरू आहे. "मुलगी परक्याचं धन नसून राष्ट्राची शक्ती आहे" हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवत सरला शामराव कामे आजही अहोरात्र कार्यरत आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवण्याचा त्यांचा हा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १ जानेवारी २०२६


